**<u>ठळक बातम्या</u>**

- घरगुती एलपीजी सिलिंडर साठ रुपयांनी तर व्यावसायिक सिलिंडर ११५ रुपयांनी महाग, देशात इंधन तुटवटा नसल्याचं पेट्रोलियम कंपन्यांचं स्पष्टीकरण

- पश्चिम बंगाल दौऱ्यात राजशिष्टाचारांचं उल्लंघन झाल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून नाराजी व्यक्त

- सर्वप्रकारच्या पात्र संस्थांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ दिला जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- हैदराबादमध्ये १३० माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- इतर आखाती देशांवर हल्ले केल्याबद्दल इराणच्या अध्यक्षांकडून माफी, अमेरिकेसमोर शरणागतीला मात्र स्पशेल नकार

**<><><><><><>**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपयांनी वाढ झाली आहे. दर वाढीनंतर आता एका सिलेंडरची किंमत दिल्लीमध्ये ९१३ रुपये, मुंबईत ९१२ रुपये ५० पैसे, कोलकत्ता इथं ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे इतकी झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत देखील ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

होर्मूझच्या सामुद्रधुनीतली जलवाहतूक बंद झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यात खंड पडल्याच्या समाज माध्यमांवर प्रसृत झालेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असून भारताकडे पुरेसे इंधन साठे आणि पर्यायी पुरवठा स्त्रोत आहेत असं हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीनं स्पष्ट केलं आहे. इंधन पुरवठ्यामधला व्यत्यय किंवा

तुटवडा या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असून नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये तसंच पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असं कंपनीनं ट्विट करून सांगितलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालच्या दौऱ्यामध्ये राज्य सरकारने राजशिष्टाचारांचं पालन केलं नाही अशी नाराजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली आहे. ९व्या आंतरराष्ट्रीय संथाळी परिषदेसाठी आज राष्ट्रपती सिलिगुडी इथं गेल्या होत्या. राजशिष्टाचारांनुसार विमानतळावर राष्ट्रपतींचं स्वागत मुख्यमंत्री करतात. मात्र बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सध्या कोलकात्यात मतदारयाद्यांमधून कथितरीत्या नावं वगळल्याच्या निषेधात धरणं आंदोलन करीत आहेत. त्या किंवा राज्याचे इतर कोणी मंत्री देखील विमानतळावर उपस्थित नव्हते.

राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाचं स्थळ बिधाननगर या सोयीच्या ठिकाणाहून गोशियापूरला हलवलं. अनेक आदिवासींना कार्यक्रमाला जाण्यापासून रोखण्यात आलं असंही राष्ट्रपतींनी कार्यक्रमानंतरच्या अनौपचारिक संवादात नमूद केलं.

**होल्ड - राष्ट्रपती बाइट**

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या तृणमूल काँग्रेस सरकारनं सर्व हद्द ओलांडल्या आहेत अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रपती या सर्व प्रकारच्या राजकारणापेक्षा वेगळ्या आहेत आणि त्यांचा मानसन्मान नेहमीच राखला गेला पाहिजे. या प्रकारामुळं आदिवासींचाही अपमान झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह इतरही अनेक नेत्यांनी या प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

आम्ही राष्ट्रपतींचा आदर करतो, मात्र निवडणुकांच्या काळात भाजपाच्या सांगण्यावरुन राजकारण करु नका असं आवाहन पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता

बॅनर्जी यांनी राष्ट्रपतींना केलं आहे. निवडणुकांच्या काळात आल्यामुळं राष्ट्रपतींच्या दौऱ्यात सहभागी होता आलं नाही. पश्चिम बंगालमध्ये आदिवासींच्या कल्याणासाठी विविध उपक्रम सुरू असल्याची माहिती बॅनर्जी यांनी दिली.

<><><><><>

लोकसभेत सभापती ओम बिरला यांच्याविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर येत्या सोमवारी चर्चा होणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा येत्या सोमवार, नऊ मार्चपासून सुरू होत असून त्याच दिवशी या ठरावावर चर्चा अपेक्षित आहे. काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षानं नऊ आणि दहा मार्च रोजी सर्व सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्याचा व्हिप जारी केला आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात विरोधी पक्षांनी लोकसभा सचिवालयाकडे हा अविश्वास ठराव दाखल केला होता. या ठरावावर ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, के. सुरेश आणि मल्लिकार्जुन खरगे हा प्रस्ताव मांडणार आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिर्ला यांच्या कर्तुत्वाचं कौतुक केलं आहे. संसदेचं कामकाज ते अतिशय योग्य पद्धतीनं चालवतात. सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही बाजूंचा त्यांच्याकडून आदर होतो, असं प्रधानमंत्री म्हणाले. राजस्थानमधल्या कोटा इथल्या विमानतळाच्या पायाभरणी समारंभादरम्यान त्यांनी व्हिडीओद्वारे हा संदेश दिला आहे.

<><><><><>

राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना, कर्ज देण्यासाठी पात्र अशा कोणत्याही संस्थेकडून घेतलेल्या कर्जासाठी लागू राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. नागपूरमधे ते वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकित राहिलेली २ लाख रुपये पर्यंतची कर्ज माफ करण्याच्या दृष्टीनं काल

अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. त्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. ही कर्जमाफी बँकेला नसून शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा याकरता अंमलबजावणीची कार्यपद्धती तयार करण्यात येत आहे, असं ते म्हणाले

....... **होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

**<><><><><><>**

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी पदाचा राजीनामा दिल्यावर नव्या सरकारमधे त्यांचे पुत्र निशांत  उपमुख्यमंत्री होतील. जदयूचे आमदार आणि नितीश कुमार यांचे निकटवर्ती हरी नारायण सिंग यांनी आज पाटण्यात सांगितलं की पक्ष कार्यकारिणीच्या बैठकीत एकमताने हा निर्णय झाला. निशांत उद्या औपचारिकरीत्या संयुक्त जनता दलाचे सदस्य होतील, असं त्यांनी सांगितलं. नितीशकुमार यांच्या राजीनाम्यानंतर मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय भारतीय जनता पार्टी घेईल असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

हैदराबादमध्ये आज १३० माओवाद्यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवंथ रेड्डी यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. या पथकांनी ए के ४७ रायफलींसह १२४ बंदुका आणि ५ हजार २०० जिवंत काडतुसं पोलिसांकडे जमा केल्याचं पोलीस महासंचालक बी शिवथर रेड्डी यांनी सांगितलं. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांपैकी १२५ छत्तीसगडमधले, ४ तेलंगणातले तर १ आंध्र प्रदेशातला आहे. सध्या भूमिगत असलेला गणपती आणि त्याच्या सहकाऱ्यांनाही शरणागती पत्करून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावं आणि तेलंगणाच्या पुनर्बांधणी प्रक्रियेत भागीदाराची भूमिका निभावावी, असं आवाहन रेड्डी यांनी केलं.

**<><><><><><>**

हरियाणा राज्यातल्या जिंद जिल्ह्यात आज गुलाल उत्पादन करणाऱ्या कारखान्यात लागलेल्या आगीत चार महिला कामगारांचा मृत्यू झाला तर किमान ११ जण जखमी झाले आहेत. कारखान्याच्या प्रवेशद्वारावर आग लागली आणि त्यानंतर कारखान्यात धूर पसरला त्यावेळी काही कामगारांनी स्वतः चा बचाव करण्यासाठी कारखान्याच्या छतावरून उड्या मारल्या.

<><><><><>

नेपाळच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष स्पष्ट बहुमताकडे वाटचाल करत असून या पक्षाचे उमेदवार आणि प्रधानमंत्रीपदाचे दावेदार बलेन्द्र शाह यांनी नेपाळचं प्रधानमंत्रीपद चार वेळा भूषवलेल्या के पी शर्मा ओली यांचा मोठ्या मताधिक्यानं पराभव केला आहे. दरम्यान, नेपाळची जनता आणि सरकारनं यशस्वी आणि शांततापूर्ण वातावरणात निवडणुका पार पाडल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

आखाती देशांमध्ये आपली ड्रोन आणि क्षेपणास्त्र डागल्याबद्दल इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी त्या देशांची माफी मागितली आहे. पेझेश्कियान यांचा हा व्हिडिओ संदेश जारी होण्यापूर्वी काही तास आधी इराणनं क्षेपणास्त्र आणि ड्रोनचे हल्ले केल्यानं दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून होणाऱ्या उड्डाणांचं वेळापत्रक विस्कळीत झालं. यासोबतच इराणनं सौदीमधल्या एका मोठ्या तेल प्रकल्पालाही लक्ष्य केलं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची शरणागती पत्करण्याची केलेली मागणी आपण फेटाळत असल्याचंही पेझेश्कियान यांनी या व्हिडिओ संदेशातून स्पष्ट केलं. दरम्यान पेझेश्कियान यांच्या संदेशानंतर लगेचच, ट्रम्प यांनीही या युद्धात इराणच्या आणखी अधिकाऱ्यांना लक्ष्य केलं जाईल असा इशारा समाजमाध्यमावरून दिला. आज इराणवर अधिक तीव्र हल्ला केला जाणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले. अमेरिका सरकारनं इस्त्रायलला १५ कोटी १०

लाख अमेरिकी डॉलर्सच्या शस्त्रास्त्र विक्री प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. या चर्चेत पुतिन यांनी इराणचे सर्वोच्च नेते, वरिष्ठ अधिकारी आणि सध्या सुरू असलेल्या संघर्षात मारल्या गेलेल्या नागरिकांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केल्याचं रशियाच्या निवेदनात म्हटलं आहे. हा संघर्ष तात्काळ थांबावा आणि त्यासाठी राजनैतिक तोडगा काढला जावा ही रशियाची भूमिकाही त्यांनी चर्चेत मांडली.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात उद्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. आतापर्यंत कोणत्याही संघाने सलग दोनदा विजेतेपद जिंकलेलं नाही. यावेळी भारताकडे इतिहास रचण्याची सुवर्णसंधी आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला असून उद्याचा अंतिम सामना जिंकला, तर टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सलग दोन ट्रॉफी जिंकणारा तो पहिला संघ बनणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात टी-२० क्रिकेटमध्ये झालेल्या सामन्यांत भारताचा वरचष्मा राहिला आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण ३० सामने खेळले गेले आहेत, ज्यात भारताने १८ तर न्यूझीलंडने ११ सामने जिंकले आहेत. एक सामना बरोबरीत सुटला होता.

**//<><><><><>//**